**सं.फौ.ख.क्र. ८७४/२०२२**
**नि.क्र. २० लगत**
**अस्मिता स्वप्नील पवार वि. वासंती मधुकर गायकवाड**

**फिर्यादीतर्फे वकील श्री. आर. ई. येरुणकर यांच्या मार्फत जादा सरतपास सुरु.**

**१)** मला आरोपीने दि. २०/०९/२०२२ रोजी रक्कम रु. ३,१६,०००/— रक्कमेचा धनादेश दिला होता. आता मला तो ।नादेश दाखवला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखते. सदर धनादेशला **निशाणी २२** देण्यात येत आहे. त्यानंतर मी आरोपीला दि. ०५/११/२०२२ रोजी नोटीस पाठवली होती. ती नोटीस न बजावता परत आली. सदरच्या लिफाफ्यास **निशाणी २३** देण्यात येत आहे. आता बंद लिफाफ्यातील नोटीस बाहेर काढण्यात आली. ती नोटीसची प्रत ती मुळ प्रत असून त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्याला **निशाणी २४** देण्यात येत आहे. त्या नोटीस मधील मजकूर बरोबर आहे. ती नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठवली. त्याची रजिस्टर पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येत आहे. आरोपीने दिलेला धनादेश न वटता परत आला. तो बॅंकेचा मेमो मी दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येत आहे. आरोपीने माझी फसवणुक केली म्हणून मी फिर्याद दाखल केलेली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृती
माझे समक्ष,

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.01.20 10:38:37 +0530

**( एस.एस.देशमुख )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खालापुर.

ठिकाण:— खालापुर,
दिनांक:— १९/०१/२०२६.